## निशाणी क्र.४३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने जैसे–थे परिस्थिती ठेवण्याकरिता दाखल केला आहे. वादीने असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही मूळची श्रीपाद वामन काने यांच्या मालकीची होती. दिनांक ०४/०९/१९८० रोजी रक्कम रुपये ४७,०००/– च्या मोबदल्यात वादी व बाजीराव दगडू माने यांनी सदरची मिळकत खरेदी घेतली. त्याची फेरफार नोंद क्र.१२१० धरुन प्रमाणित करण्यात आली. त्यानंतर वादी व प्रतिवादीचे वडील यांच्यामध्ये मौजे शेवते येथील जमीन गट क्र.०६ व ट्रॅक्टरबाबत तडजोड झाली. जमीन गट क्र.५९४ ही मिळकत सामाईकात खरेदी केल्यामुळे वादी व बाजीराव दगडू माने यांनी सदरची मिळकत सामाईकात ठेवली. सदर मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादींचे वडील यांचा कब्जा होता. सदर मिळकत वादी व प्रतिवादीचे वडील हे स्वतंत्रपणे वहिवाटून उत्पन्न घेत होते. असे असताना वादीच्या वहिवाटीस प्रतिवादीचे वडील हरकत अडथळा करु लागले. वादीने मिळकतीबाबतची कागदपत्रे काढले असता असे आढळून आले की, रे.मु.क्र.५५३/१९८८ मधील दाव्यामध्ये वादी व प्रतिवादीचे वडील यांच्यामध्ये तडजोड होऊन नमूद मिळकतीमधील हिस्सा प्रतिवादीच्या वडिलांना सोडून दिला असे नमूद केले व फेरफार क्र.२५०५ असा तयार करण्यात आला. सदरचा फेरफार क्र.२५०५ बोगस व खोटया कागदपत्रांच्या आधारे तयार करुन दावा मिळकतीमध्ये असलेले वादीचे नाव कमी करुन प्रतिवादीच्या वडिलांनी सदरची मिळकत पांडुरंग परमेश्वर माने यांना दिनांक २२/०३/१९९० रोजी विक्री केल्याचे दाखवले व तीच मिळकत त्यांनी दिनांक २६/१२/२००८ रोजी खरेदी घेतल्याचे दाखवले. वास्तविक पाहता गट क्र.५९४ मध्ये वादीचा असणारा हिस्सा वादीने प्रतिवादीच्या वडिलांच्या नावे कधीही सोडलेला नाही. सन १९९० व सन २००८ मध्ये बेकायदेशीररित्या खरेदीखते तयार केली. सदरची खरेदीखते वादीच्या हक्कांवर बंधनकारक नव्हती व नाही. वरीलप्रमाणे

परिस्थिती असताना प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकत गौरी अविनाश भोसले यांना खरेदीदस्त क्र.१७३३/२०२० ने दिनांक २५/०६/२०२० रोजी बेकायदेशीररित्या विक्री केली आहे व त्यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.१३५८६ अन्वये प्रमाणित करण्यात आली आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी वर नमूद दावा मिळकतीमध्ये रेस्ट हाऊसचे काम जलदगतीने सुरु केले आहे. रेस्ट हाऊसच्या बांधकामालगत हेलिपॅडचे बांधकाम देखील सुरु केलेले आहे. प्रतिवादी क्र.३ यांचे सदरचे कृत्य बेकायदेशीर असून यातील वादीच्या हक्कांवर गदा आणणारे आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत अंतरिम आदेश प्रतिवादीचे म्हणणे येईपर्यंत देण्यात यावेत अशी वादीने विनंती केली आहे.

२. वादीने सदर अर्जासोबत दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याची प्रत दाखल केली आहे. तसेच दावा मिळकतीवर सुरु असलेल्या बांधकामाचे देखील फोटो दाखल केले आहेत. तसेच रे.मु.क्र.५५३/१९८८ चा हुकूमनामा दाखल केला आहे. फेरफार क्र.२५०५ चे अवलोकन केले असता वादीने प्रतिवादीचे वडील बाजीराव माने यांच्या लाभात गट क्र.५९४ म्हणजेच दावा मिळकतीमधील अधिकार सोडून दिल्याचे दिसून येते. सदरची नोंद सन १९८८ साली झाल्याचे दिसून येते. वादीने सन १९८८ पासून आजतागायत सदरची नोंद का आव्हानित केली नाही याबाबत कोठेही स्पष्टीकरण दिलेले नाही. अर्जाचे स्वरुप पाहता प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीचे अंतरिम जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबतची विनंती फेटाळण्यात येते.

दिनांक:– २९.११.२०२५ (पी. आर. पाटील)

५वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पंढरपूर.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 29.11.2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 29.11.2025 |
| Judgment/Order uploaded on | - | 01.12.2025 |